अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रमांतर्गत भाषा विषयांची प्रात्यक्षिक कार्य– एक चिकित्सक अभ्यास

डॉ.सौ.उज्वला केशवराव सदावर्ते, प्राचार्या, विवेकवर्धिनी अध्यापिका महाविद्यालय, नांदेड.

सौ.दिपाली गणेशराव जोशी, प्राध्यापिका, ज्ञानवर्धिनी अध्यापक महाविद्यालय, हिंगोली

प्रस्तावना :–

सेवापूर्व अध्यापक शिक्षणाद्वारे एका सर्वसामान्य व्यक्तीची व्यावसायीक म्हणून पूर्वतयारी करन घेतली. या शिक्षणक्रमात तात्वीक आणि प्रात्यक्षिक अशा दोन्ही अंगांचा समावेा दिसुन येतो. अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमाची तात्विक भाग व प्रात्यक्षिक कार्य अशी विभागणी करण्यात आलेली आहे.

व्यावसायीक बनू इच्छिणा–या छात्रअध्यापकांची जशी अवबोधात्मक घडण होणे आवश्यक आहे. तशीच कौशल्यात्मक आणि भावात्मक घडण होणेही आवश्यक आहे. याच दृष्टीने तात्वीक भागाशी संबंधित प्रात्यक्षिक कार्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये सुक्ष्मअध्यापन, सरावपाठ, समाजसेवा, कला, संगित, शारीरिक शिक्षण आणि छात्राध्यापक सेवाकाल. छात्रअध्यपकांची संवेदन क्षमता विकसित होण्यासाठी प्रात्यक्षिक कार्याची मदत होत असते. त्यात भाषा विषयक प्रात्यक्षिक कार्यांना अनन्यसाधारण महत्व आहे.

मानवाच्या व्यक्तिमत्व विकासात भाषेचे महत्व अन्ययसाधारण आहे. म्हणुनच शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमात प्रथम भाषा मराठी, द्वितीय भाषा हिंदी व तृतीय भाषा इंग्रजी यांच्या प्रात्यक्षिक कार्यांचा समावेश करण्यात आला आहे.

संशोधनाची गरज व महत्व :–

शिक्षण म्हणजे सुपरिवत्रन असे सुपरिवत्रन घडवुन व्यक्तीमत्व विकास करण्याचे कार्य अध्यापक विद्यालयात चालते. मानवाच्या व्यक्तीमत्व विकासात मातृभाषे बरोबरच इतर भाषांना अनन्यसाधारण महत्व आहे. म्हणुनच शिक्षकांना प्रशिक्षण देणा–या अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमात प्रथमक भाषा–मराठी, द्वितीय भाषा–हिंदी व तृतीय भाषा– इंग्रजी या विषयांना अत्यंत महत्व आहे.

भाषेच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांची वैचारिक, भावनिक, सांस्कृतीक जडणघडण करण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. छात्राध्यापक हे भावी शिक्षक असल्यामुळे त्यांचा स्वतःचा भाषीक विकास झाला पाहिजे आणि त्यांना विद्यार्थ्यांच्या भाषा विकास होण्यासाठी मार्गदर्शनही झाले पाहिजे. त्यासाठी प्रात्याक्षिक कार्याचा अनुभव त्यांना मिळाला पाहिजे. यासाठी अभ्यासक्रमात प्रात्याक्षिक कार्याला महत्व आहे.

प्रात्यक्षिक कार्य करण्यासाठी छात्राध्यापक अभ्यासक्रमाची, विषयाची उदिष्टे जाणून पाठयपुस्तकांचा सखोल आणि सर्वांगाने अभ्यास करण्याची सवय स्वतः निर्माण करतील. विविध विषयांवरील ग्रंथामधील ज्ञान प्राप्त करण्याची आकलनशक्ती यांचा विकास भाषेच्या अभ्यासाने होतो. भाषा हा केवह एक विषय नाही ते शिक्षणाचे, अध्ययन अध्यापनाचे, अभ्यासाचे एक प्रमुख माध्यम आहे. भाषा हे ज्ञान संग्रहाचे व ज्ञान संक्रमणाचे माध्यम आहे. भाषा हीच माणसाच्या सर्वांगिण विकासाची व उन्नतीची कर्ती व धात्री आहे. भाषा मानवाने निर्माण केली असेलही परंतू आजचा सुशिक्षीत, सुसंस्कृत विकसीत मानव हा भाषेनी घडविला आहे.

अध्यापक विद्यालयात भाषा विषयांचे प्रात्यक्षिक कार्य हे नियंत्रीत व कृत्रीम वातावरणात पार पडतात त्यामुळे उणिवा राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच संशोधिका शिक्षक प्रशिक्षण संस्थेत अध्यापनाचे कार्य करते. अध्यापक विद्यालयात प्रात्यक्षिक कार्याच्या नियोजनात, अंमलबजावणीत तसेच मुल्यमापनात संशोधन करुन येणा–या अडचणी शोधने व त्यानुसार उपाययोजना करण्याकरीता संशोधन करण्याचे ठरविले आहे.

समस्या विधान :–

अध्यापक विद्यालयातील अभ्यासक्रमांतर्गत भाषा विषयांची प्रात्यक्षिक कार्य– एक चिकित्सक अभ्यास.

पारिभाषीक शब्दांच्या व्याख्या :–

1. अध्यापक विद्यालय :–

'' ज्या विद्यालयात प्राथमिक स्तरावरील शिक्षक तयार करण्यासाठी जे सेवापूर्व प्रशिक्षण दिले जाते असे शिक्षणशास्त्र विद्यालय म्हणजे अध्यापक विद्यालय होय.''

2. भाषा विषयाची प्रात्यक्षिक कार्ये :–

'' अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमात भावी शिक्षकांना त्यांचा भाषीक विकास होण्यासाठी व शिक्षक झाल्यानंतर त्यांच्या विद्यार्थ्यांची वैचारीक, भावनिक, सांस्कृतिक जडणघडण करण्यास सक्षम बनविणारे प्रात्यक्षिक कार्य.''

3. समस्या :–''समस्या म्हणजे भाषा विषयाच्या प्रात्यक्षिक कार्यात येणा–या अडचणी.''

4. चिकीत्सक अभ्यास :–''अध्यापक शिक्षण पदविका प्रात्यक्षिक कार्याच्या गुण व दोषांचा अभ्यास.

संशोधनाची उदीष्टे :–

अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमांतर्गत विविध विषयांची प्रात्यक्षिक कार्ये छात्रअध्यापकांना करावी लागतात त्यातील भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांचा चिकीत्सक अभ्यास करतांना संशोधिकेने खालील उदीष्टे मांडलेली आहे.

1. अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमांतर्गत भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांचे स्वरुप अभ्यासणे.

2. भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांच्या नियोजना संदर्भात येणा–या अडचणींचा अभ्यास करणे.

3. भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांदरम्याण छात्राध्यापकांना येणा–या अडचणींचा अभ्यास करणे.

4. भाषा विषयांच्या प्रात्यक्षीक कार्यांच्या अंमलबजावणीत येणा–या अडचणींचा शोध घेणे.

5. भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांच्या मुल्यमापना संदर्भात येणा–या अडचणींचा शोध घेणे.

6. भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यात येणा–या अडचणी दुर करण्यासाठी उपाययोजना व शिफारशी करणे.

संशोधनाची गृहीतके :–

अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमांतर्गत भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांचा चिकित्सक अभ्यास करतांना संशोधिकेने खालील गृहीतके मांडली आहेत.

1. अध्यापक शिक्षण पदविका अभ्यासक्रमा अंतर्गत भाष विषयांचे प्रात्यक्षिक कार्य हे अनिवार्य प्रात्यक्षिक कार्य आहे.

2. भाषा विषयांचे प्रात्यक्षिक कार्यांमुळे छात्राध्यापकांचा त्रैभाषिक विकास होतो.

3. भाषा विषयांच्या प्रात्यक्षिक कार्यांमुळे छात्राध्यापकांच्या अध्यापनास उपयुक्त संप्रेषण माध्यमांचा विकास होतो.

संशोधनाची कार्यपध्दती :–

प्रस्तुत संशोधनात अध्यापक शिक्षण पदविका प्रशिक्षणात नव्यानेच समाविष्ट केलेल्या भाषा विषयाच्या प्रात्यक्षिक कार्यांचा चिकीत्सक अभ्यास करावयाचा असल्याने प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आलेली आहे.

जनसंख्या व न्यादर्श :

संशोधिकेने सहेतुक नमुना निवड पध्दतीने परभणी व हिंगोली जिल्हातील मराठी माध्यमाच्या अध्यापक विद्यालयांपैकी 20 अध्यापक विद्यालयाची न्यादर्श म्हणुन निवड केली आहे. प्रत्येक अध्यापक विद्यालयातील प्रथम व द्वितीय वर्षातील प्रत्येकी 15 छात्राध्यापक व भाषा विषयाशी संबंधीत 03 अध्यापकाचार्य यांचा समावेश न्यायदर्शात केलेला आहे.

संशोधनाची साधने :–

संशोधिकेने संशोधन विषयासंदर्भात माहिती गोळा करण्यासाठी छात्राध्यापकांसाठी व अध्यापकाचार्यासाठी प्रश्नावली तयार केली. ही प्रश्नावली मिश्र स्वरुपाची आहे. सदर संशोधन साधन तयार करतांना मार्गदर्शकांच्या सुचनांचा विचार केला.

माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :–

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने प्रश्नावी साधनाद्वारे अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापक व अध्यापकाचार्य यांचे कडून माहितीचे संकलन केले. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने माहितीचे अर्थनिर्वचन व विश्लेषण करण्या करीता शेकडेवारी (%) या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर केलेला आहे.

निष्कर्ष :

छात्राध्यापक व अध्यापकाचार्य प्रश्नावलीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले. त्यावरुन पुढील उदिष्टानुसार ठळक निष्कर्ष काढण्यात आले.

1. बहुतांश अध्यापक विद्यालयात मराठी, हिंदी व इंग्रजी या तीन्ही भाष विषयांच्या प्रात्यक्षिक कार्याची माहिती दिली जाते व योग्य मार्गदर्शन केले जाते.

2. बहुतांश अध्यापक विद्यालयात तीन्ही भाषेचे अनिवार्य व सरावाचे प्रात्यक्षिक कार्य घेतले जातात.

3. बहुतांश अध्यापक विद्यालयातील छात्राध्यपकांना प्रात्यक्षिक कार्य करतांना भाषेची अडचण जाणवते.

4. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयातील छात्राध्यपकांना हिंदी व इंग्रजी विद्यालयातील छात्राध्यपकांना हिंदी व इंग्रजी विषयांचे सरावपाठ घेतांना अडचणी जाणवतात.

5. निम्यापेक्षा जास्त छात्राध्यपकांना भाषेची प्रात्यक्षिक कार्य करतांना संदर्भ ग्रंथ सहज उपलब्ध होतात. निम्यापेक्षा कमी छात्राध्यपकांना भाषेची प्रात्यक्षिक कार्य रकतांना संदर्भ ग्रंथ सहज उपलबध्द होत नाही.

6. निम्यापेक्षा जास्त अध्यापक विद्यालयात वेळापत्रकात दिलेल्या तासिकेनुसार प्रात्यक्षिक कार्य घेतले जाते. निम्यापेक्षा कमी अध्यापक विद्यालयात वेळापत्रकात दिलेल्या तासिकेनुसार प्रात्यक्षिक कार्य घेतले जात नाही.

7. बहुतांश अध्यापक विद्यालयात गटवार प्रात्यक्षिकासाठी विद्यार्थ्यांचे गट हजेरी क्रमांकानुसार पाडले जातात.

8. बहुतांश अध्यापक विद्यालयात भाषा विषयाच्या प्रात्यक्षिक कार्याची अपेक्षित उदिष्टे साध्य होतात.

बहुतांश अध्यापक विद्यालयात भाषा विषयांची प्रात्यक्षिक कार्य व गटवार प्रात्यक्षिक कार्याचे मुल्यमापन निकषानुसार केले जाते.

<u>ठळक संदर्भ ग्रंथ सूची :</u>

मुळे रा.श. व उमाठे वि.तु. (1977) शैक्षणिक संशोधनातील मुलभुत तत्वे नागपुर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ.

प्रा. पवार ना.ग., मातृभाषा मराठीचे आशययुक्त अध्यापन, नुतन प्रकाशन, पुणे.

डॉ.करंदीकर सुरेश, मराठी आशय अध्यापन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापुर.

डॉ.कुंडले म.बा. (1997) मराठीचे अध्यापन, श्रीविद्या प्रकाशन पुणे.